नोव्हेंबर – २००७

# सहकाराचे टी. व्ही चॅनल

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, पद्मभुषण व सहकार महर्षी **स्व. श्री वसंतदादा पाटील यांच्या १३ नोव्हेंबर २००७** या जयंती दिनाच्या निमित्ताने आम्ही महाराष्ट्र राज्य सरकारला, राज्यातील सहकारी संस्थांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या मालकीचे '' सहकाराचे टी. व्ही. चॅनल '' सुरू करणेसाठी योजना सादर करीत आहोत.

**''पतसंस्था परिवार '' ह्या मासिकाला १३ नोव्हेंबर २००७ रोजी ७ वर्षे पूर्ण होत आहेत.** उभ्या महाराष्ट्राचे दादा म्हणजेच ''स्व. वसंतदादा.'' सर्वांना त्या काळातही आदरयुक्त भिती दादांची होती. दादांनी कोणाकडे बघितले तरी प्रेमाचा व विश्वासाचा वर्षाव व्हायचा. जवळ बसविले तर न्यायाचे चित्कार अंगावर यायचे आणि पाठीवर थाप पडली की माणूस तृप्त व्हायचा. असे ते दादा. आणि त्यांचे आदर्श तेवत ठेवण्यासाठीच आम्ही १३ नोव्हेंबर २००० रोजी **पतसंस्था परिवार** ह्या मासिकाची ज्योत पेटवली. ह्या ज्योतिला कधी विझू दिले नाही. अशी ही दादांची आठवण आम्ही ह्या प्रमाणे जपली आहे.

**'' पतसंस्था परिवार '' हे मासिक ८ व्या वर्षात पर्दापण करीत आहे**. राज्यात १ लाख ८० हजारांच्यावर विविध प्रकारच्या सहकारी संस्था सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत आहेत. ह्यामध्ये पतसंस्था, बँका, सहकारी साखर कारखाने व सुतगिरण्या, महिला व बेरोजगारांच्या सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, मच्छिमारांच्या सहकारी संस्था, औद्येगिक व प्रिमायसेस सहकारी संस्था, मजूर व ग्राहक सहकारी संस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो. ह्या सहकारी संस्थांसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड व सहकार खात्याच्या माध्यमातून त्या – त्या संस्थांसाठी वेगवेगळे कायदे, शासनाचे आदेश व परिपत्रके अलीकडच्या काळात नियमितपणे प्रसिध्द होत आहेत. त्यापैकी **१ टक्का सुध्दा सहकारी संस्थांना ह्या आदेशाची माहिती वेळच्या वेळी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था संबंधितांकडे नाही.** त्याचे दुष्परिणाम सर्वत्र बघायला मिळतात. आणि ह्या हेतूनेच **स्व. दादांच्या जयंतीनिमित्त एक पारदर्शक योजना** आम्ही महाराष्ट्र सरकारसाठी सादर करीत आहोत.

**महाराष्ट्र राज्य सरकारने स्वतःच्या मालकीचे सहकाराचे टी. व्ही. चॅनल सुरू करणे ही संकल्पना आहे.** ह्या योजनेला वैधानिक दर्जा देऊन त्यामध्ये सहकार सचिव, सहकार आयुक्त, साखर आयुक्त व कृषि आयुक्त यांची **थोर समाजसेवक श्री अण्णासाहेब हजारे यांचेसह** समितीचे गठन करावे आणि यांचे स्वतंत्रपणे व पूर्ण नियंत्रणाखाली हे चॅनल उदयास आणावे. यासाठी लागणारी सर्व व्यवस्था व आवश्यक खर्चाची जबाबदारी १०० टक्के महाराष्ट्र शासनाने स्विकारावी.

महाराष्ट्र राज्यात विविध प्रकारच्या सहकारी संस्थांना लागू असणारे सर्व कायदे, नियम व वेळोवेळी होणारे बदल अंतर्भुत करावे.सहकारी संस्थांची संख्या, संस्थेचा प्रकार, भाग – भांडवल, ठेवी, व्याजदर, कर्जवाटप, थकबाकी इत्यादी संदर्भात सर्व माहिती नियमितपणे उपलब्ध करून द्यावी. प्रामुख्याने नोंदणी, उपविधी दुरूस्ती व इतर अनुषंगीक मंजूरीचे प्रस्ताव यासंदर्भात ई – मेल, इंटरनेट, वेबसाईटद्वारे प्रश्न सोडविणे कामी अद्यावत करावे. ऑनलाईन संपूर्ण यंत्रणा उभी करावी.

**सहकारी साखर कारखाने व त्यांची विविध प्रकारची खरेदी व विक्री इंटरनेटवर करण्याची सुविधा सुरू करावी.** तसेच केंद्र व राज्य सरकार, मा. मंत्री समिती व मा. साखर आयुक्त यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय व त्याची अंमलबजावणी, एकूण ऊस क्षेत्र, एकूण गाळप, साखर उतारा, दैनंदिन ऊस गाळप क्षमता, उत्पादित साखर, मळी, बगॅस, हेक्टरी उत्पादन, ऊस खरेदी दर, ऊसाच्या बिलातून करावयाची कपात, कर्जे, ठेवी, सभासदांच्या ठेवीवरील व्याज, साखर विक्री पोती, साखर उत्पादनाचा सरासरी प्रति क्विंटल खर्च, ऊसाचा तोडणी व वाहतुक खर्च, इथेनॉल, सहवीज निर्मीती प्रकल्प, कामगारांची संख्या, बोनस, सानुग्रह अनुदान व पगार, खते, ऊस बेणे पुरवठा, अर्कशाळा, साखर साठविण्याची व्यवस्था, सिव्हील बांधकामे, गंगाजळी व इतर निधी, रोख व बँकातील शिल्लक गुंतवणुका, चालू व कायम जिंदगी, चालू देणी व तरतुदी, सरकारी देणी, इतर देणी, नफा – तोटा, संचीत तोटा इत्यादी संदर्भात सर्व कामकाज इंटरनेटवर उपलब्ध करून द्यावे. **सहकाराच्या टी. व्ही. चॅनलमधून साखर, सहकार व कृषी आयुक्तांनी जनतेसमोर नियमितपणे येवून ऑनलाईन जनतेशी हितगुज करावे.** तसेच विचारलेली माहिती व त्याची उत्तरे त्या – त्या वेळी नियमितपणे द्यावीत. ह्याचा सुपरिणाम राज्याच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर व सहकाराविषयी प्रचंड आत्मविश्वास व पारदर्शकतेचे हुबेहुब प्रतिबिंब उमटल्याशिवाय राहणार नाही.

सहकारी संस्थासाठी जमिनी, जागा, मशिनरी, कॉम्प्युटर्स,फनिचर्स, स्टेशनरी, नोकर भरती, त्यांचे पगार इत्यादी संदर्भात एकसुत्रीपणा येण्यास व त्यांचे चांगले आर्थिक परिणाम राज्यभर होतील. सहकाराचे टी. व्ही. चॅनल ही संकल्पनाच मुळात **सर्व समावेशक व सर्वांना समान व तत्परतेने न्याय ह्या तत्वावर उभारलेली आहे**.खुल्या अर्थव्यवस्थेत टिकून राहण्यासाठी हि काळाची गरज आहे. **कालपर्यंत जे झाले त्याचे सिंहावलोकन करून उज्वल्ल भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी ही योजना महाराष्ट्र सरकारने स्व. दादांच्या जयंतीनिमित्त स्विकारावी** अशी आग्रहाची विनंती या अग्रलेखाद्वारे आम्ही करीत आहोत.

महाराष्ट्र राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी या संकल्पनेला स्वत:हून उचलुन धरून त्याचा पाठपुरवठा करणे हीच खऱ्या अर्थाने दादांची चिरंतन ठेव जपण्याची वेळ आहे. किमान येथूनपुढे तरी ही सहकारी चळवळ सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या परिश्रमावर स्थिरावून **त्यांचे सर्वांगिन आर्थिक फायदे जनतेच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी राज्य सरकारने** या संकल्पनेच्या परिपूर्णतेने स्विकारावी ही विनंती आहे.

**समान न्यायची भुमिका दादांनी ह्या क्षेत्रात नावारूपाला आणली.** शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य सहकारी कार्यकर्त्यांच्या आर्थिक कमजोरीचा व अज्ञानाचा गैरफायदा किमान येथूनपुढे तरी ह्या योजनेमुळे कोणाला घेत येणे शक्य होणार नाही. अशी ही योजना आहे. हे सहकाराचे टी. व्ही. चॅनल फक्त सहकारापुरते मर्यादित ठेवून प्रत्येक प्रकरणाचा झालेला निर्णय, कालावधी, नकाराची कारणे, त्रुटी याचा उलगडा यामुळे सहज होऊ शकतो. राज्यात शहरामध्ये, सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागिय सहनिबंधक, सहकार व साखर आयुक्त तसेच कृषि आयुक्त यांच्या प्रत्येक ठिकाणी एकाच विषयाच्या संदर्भातील कायद्याच्या आधारे वेगवेगळे निर्णय व सोईनुसार वाढलेला कालावधी याला निश्चितपणे लगाम लागेल. मध्यस्थांमार्फत चाललेले सर्व कामकाज यामुळे थांबेल.

लेखापरिक्षणाच्या बाबतीत राज्यात उडालेला गोंधळ निश्चितपणे नाहिसा होईल. **कमी वेळेत व कमी मनुष्यबळात व कमी खर्चात सर्वांना समान न्यायाची भुमिका बजावता येईल.**

शेवटी सरकारला हेच हवे असते. परंतु प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे मापदंड वापरले जात असल्यामुळे ह्या क्षेत्रात ९९ टक्के सहकारी संस्था चालवणाऱ्या कार्यकर्त्यांना, ठेवीदारांना, शेतकऱ्यांना , सभासदांना **मला मिळालेले इतरांसारखेच आहे आणि कुठेही दुजाभाव नाही** ही भावना होत नाही. आणि म्हणून **पतसंस्था परिवार** हे मासिक ८ व्या वर्षात पर्दापण करीत असताना स्व. दादांची आठवण महाराष्ट्र राज्याच्या माध्यमातून संपूर्ण देशाला चिरकाल टिकून रहावी, यासाठी सहकाराचे टी. व्ही. चॅनल ही संकल्पना सहकारी चळवळीस आम्ही अर्पण करीत आहोत.

दीपावली व नूतन वर्षाच्या पुन्हा एकदा हार्दीक शुभेच्छा !!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**